# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## शैक्षणिक प्रवेश विभाग

**विद्यापीठ शैक्षणिक विभागातील विद्यार्थ्यांसाठी महत्वाची सुचना**
**अनुसुचित जमाती (ST) स्कॉलरशीप व फ्रिशिप नवीन/नुतनीकरणाबाबत.**

मा. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, घोडेगाव यांच्या आदेशानुसार अनुसुचित जमाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना Online पध्दतीने सन २०१५–१६ स्कॉलरशीप व फ्रिशिप अर्ज भरावयाचे आहेत. अर्ज फक्त Online पध्दतीनेच स्विकारले जाणार असून अर्ज भरण्याची अंतिम तारीख दि. ३१/१०/२०१५ आहे.

सोबत आदिवासी विभाग आयुक्तालय यांनी दिलेल्या सुचनाचे प्रत्रक जोडत आहे.

शिष्यवृत्तीसाठी पात्र विद्यार्थ्यांनी खालील वेबसाईटवरून प्रथम User ID तयार करून Login करून अर्ज भरावेत.

http://etribal.maharashtra.gov.in

वेबसाईटवरील अर्ज पुर्ण भरून त्याची एक प्रिंट काढून आवश्यक त्या सर्व कागदपत्रासह संबंधित विभागात अर्ज जमा करावेत. विभागाने प्रत्येक प्रवर्गातील विद्यार्थ्यांची माहिती शिष्यवृत्ती / फ्रिशिप याप्रमाणे वेगवेगळी करून Excel Format मध्ये भरून सीडी व हार्ड कॉपीसह पदव्युत्तर प्रवेश विभागाकडे दि. ०४/११/२०१५ पर्यंत पाठवावी. Online पध्दतीने प्रत्यक्ष अर्ज भरताना खालील कागदपत्रे आवश्यक आहेत.

तसेच विनाअनुदानित अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती/फ्रिशिप चा ऑनलाईन अर्ज भरताना जातवैधता प्रमाणपत्र कमांक भरणे आवश्यक आहे. तसेच हार्ड कॉपी सोबत जात वैधता प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत जोडणे आवश्यक राहिल.

ऑनलाईन पध्दतीने प्रत्यक्ष अर्ज भरतांना विद्यार्थ्यांसोबत खालील कागदपत्रे आवश्यक आहे.

१. इयत्ता १० वी पासूनच्या सर्व गुणपत्रिका (पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या सर्व विद्यार्थ्यांनी इयत्ता १० वी मधील परीक्षा क्रमांक व आसन क्रमांक टाकणे बंधनकारक आहे).
२. स्वत:चे वैयक्तिक राष्ट्रीयकृत बॅंकेतील विद्यार्थ्यांचा खाते क्रमांक, बॅंकेचा एमआयसीआर आणि आयएफएससी कोड नंबर तसेच खाते पुस्तकाची झेरॉक्स प्रत.
३. जातीचा दाखला.
४. शाळा सोडल्याचा दाखला. (बॅंकखाते क्रमांक आधार कार्डशी संलग्न करणे.)
५. तहसिलदाराचा उत्पन्नाचा दाखला किंवा फॉर्म १६ ची झेरॉक्स प्रत
६. आधार कार्डची झेरॉक्स प्रत (बॅंकखाते क्रमांक आधार कार्डशी संलग्न करणे.)
७. विभागात प्रवेश घेतलेल्या प्रवेश पत्राची झेरॉक्सप्रत

जे विद्यार्थी वेळेत Online पध्दतीने अर्ज भरणार नाहीत त्यांना स्कॉलरशीप व फ्रिशीप शासनाकडून मिळणार नाही. त्यामुळे होणाऱ्या आर्थिक नुकसानीस विद्यापीठ जबाबदार राहणार नाही ज्या विद्यार्थ्यांना शासनाकडून शिष्यवृत्ती/ फ्रिशिप मान्य होणार नाही अशा विद्यार्थ्यांनी प्रवेशीत अभ्यासक्रमासाठी लागु असलेली संपूर्ण फी भरणे बंधनकारक आहे. याची नोंद घ्यावी.

सहा. कुलसचिव,
शैक्षणिक प्रवेश विभाग

गणेशखिंड पुणे – ७
संदर्भ : शै. प्रवेश/ ३३५५
दिनांक : ०६-०८-२०१५

प्रत :मा. विभागप्रमुख
आपल्या विभागातील शिष्यवृत्तीसाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांना विहित मुदतीत ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरण्याबाबतच्या सुचना देण्यात याव्यात तसेच अर्जाची प्रती आवश्यक त्या कागदपत्रासह विहित मुदतीत या विभागाकडे सादर करण्यात यावे ही विनंती.

मुख्य विषयाकडे | मुख्य मजकूर जा

थिम बदला भाषा निवडा मराठी A- A A+

# ईविकास

आदिवासी विभाग आयुक्तालय

ई-विकास विषयी | अहवाल | शोध | वारंवार येणारे प्रश्न | आवश्यक कागदपत्रे | कॉलेज-कोर्स यादी

## ई-विकास विषयी

हेल्पलाइन क्रमांक: ०२२ - ६१३१६४००

- शैक्षणिक वर्ष २०१५-१६ साठी नवीन युजर नोंदणी सुरु आहे.
- शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याची अंतीम दिनांक ३१/०७/२०१५ आहे.
- शैक्षणिक वर्ष २०१५-१६ वसतिगृह प्रवेशासाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याची अंतीम दिनांक १५/०८/२०१५ आहे.
- शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याची अंतीम दिनांक ३१/१०/२०१५ आहे.
- हॉस्टेल ऍडमिशन २०१५-१६ प्रक्रीये संदर्भात, सर्व विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते कि, ज्या विद्यार्थ्यांचे रजिस्ट्रेशन इ-विकास प्रणालीमध्ये यापूर्वी झालेले आहे अशा विद्यार्थ्यांनी आपल्या लॉग-इन संबंधित सर्व अडचणींसाठी उदा. पासवर्ड रिसेट करणे किंवा युजरनेम शोधून पासवर्ड रिसेट करणे इ. करिता आपल्या संबंधित प्रकल्प कार्यालयाशी (महत्वाचे: आपल्या S.S.C. मार्कशीट सोबत) संपर्क साधावा व संबंधित प्रकल्प अधिकाऱ्यांकडून आपला लॉग-इन पासवर्ड रिसेट करून घ्यावा. रिसेट केलेला नवीन युजरनेम व पासवर्ड वापरून विद्यार्थ्यांनी आपला हॉस्टेल ऍडमिशन फॉर्म इ-विकास प्रणालीमध्ये ऑन-लाईन भरावा.

- हॉस्टेल ऍडमिशन २०१५-१६ साठी या वर्षी नवीन रजिस्ट्रेशन केलेल्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या लॉग-इन संबंधित आणि इतर सर्व विद्यार्थ्यांनी आपल्या सर्व तांत्रिक अडचणी, सूचना, तक्रारी (नोंद: आपले नाव, युजरनेम, तांत्रिक अडचण/ तक्रारीची माहिती आणि शक्य असल्यास- स्क्रीन-शॉट सहित) कृपया – etribal.support@maharashtra.gov.in या इमेलवर तत्काळ नोंदवाव्यात. तसेच तक्रारी नोंदण्यासाठी हेल्पलाईन ०२२-६१३१६४०० चा वापर करावा.
- आदिवासी विकास विभागांतर्गत ज्या महाविद्यालयांचे ई-शिष्यवृत्ती अंतर्गत मॅपिंग झालेले आहे, परंतु काही कोर्स मॅपिंग न झाल्याने विद्यार्थ्यांना व महाविद्यालयांना दिसत नाही.अशा महाविद्यालयाने संबंधित प्रकल्प अधिकारी यांच्याकडे तात्काळ संपर्क साधून मॅपिंग न झालेल्या कोर्सबाबतचे कागदपत्र तात्काळ सादर करावीत.
  संबंधित प्रकल्प अधिकारी सदर कोर्स मॅप करण्याकरिता विहित नमुन्यातील माहिती आयुक्तालयाला सादर करतील.
- कॉलेज मॅपिंगसाठी प्रकल्प अधिकारी यांना आवश्यक असणारी कागदपत्रे खालीलप्रमाणे :
  - संस्थातर्गत (Parent body)
    1. नोंदणी प्रमाणपत्र प्रत
  - महाविद्यालय (College)
    1. विद्यापीठाचे मान्यताप्राप्त पत्र.
    2. सरकार आणि युजीसी मान्यताप्राप्त पत्र.

विद्यार्थी / संस्था / विद्यालय लॉगीन

युजर आयडी

पासवर्ड

चित्रात दाखविलेली अक्षरे लिहा

c8i1k

चित्रासाठी क्लिक करा

सबमिट

पुन्हा सेट करा

पासवर्ड विसरला?

नवीन युजर बनवा

- अभ्यासक्रम (Course)
    1. कोर्स आणि विशिष्ट विद्यापीठाचे मान्यताप्राप्त / परवानगी पत्र.
    2. व्यवसायिक (Professsional) अभ्यासक्रमाबाबत AICTE चे परवानगी पत्र (लागू असेल तर).
    3. सरकारी मान्यता पत्राची प्रत .

- ज्या महाविद्यालयाने प्रकल्प कार्यालयाची मान्यता घेतली आहे तेच महाविद्यालय दिसू शकेल आणि जर विद्यार्थ्याला अर्ज करतांना आपले महाविद्यालय दिसत नसेल तर महाविद्यालयाशी संपर्क साधावा .
- सदर वर्षी पोस्ट मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीअंतर्गत काही बदल करण्यात आले आहे .
    - सदर वर्षी पोस्ट मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीअंतर्गत काही बदल करण्यात आले आहे, आदिवासी विकास विभागाने सदर वर्षाचा कॉलेज मास्टर डाटा व कोर्स मास्टरची माहिती सर्व विद्यापीठाकडून घेतलेली आहे.
    - ज्या कॉलेजांनी आधी नोंदणी केली आहे आणि आतापर्यंत etribal प्रणालीमध्ये अनुदान प्राप्त झाले आहे अशा कॉलेजांनी कॉलेज मॅपिंग परत करणे जरुरी आहे.
    - सर्व नोंदणीकृत महविद्यालयाने लॉगीन करून आपल्या कॉलेजच्या जुने नावाप्रमाणे व नवीन नाव विद्यापीठ नोंदणीप्रमाणे ड्रोपडाउन यादीमध्ये म्यापिंग करने आवश्यक आहे.
    - ज्या महाविद्यालयानी कॉलेज मॅपिंग करून सर्व कागदपत्रे प्रकल्प कार्यालयात पाठविली आहेत अशाच कॉलेजला प्रकल्प कार्यालय मान्यता देतील.
    - विद्यार्थी अशाच कॉलेजला अर्ज करतील जे कॉलेज प्रकल्प कार्यालयाकडून मान्य झालेले आहेत.
    - फक्त विद्यापीठाने मान्यता प्राप्त केलेले कोर्सेस व महाविद्यालय मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती नियोजनासाठी पात्र ठरतील व त्यानंतरच ते कॉलेज सर्व कोर्सेससाठी फी भरू शकतील.

- महाविद्यालयांनी महाविद्यालयाला /कोर्सला मान्यता मिळालेल्यांची यादी खालील लिंकवरती होमपेजवर कॉलेज - कोर्स यादी या Tab वर क्लिक करून पाहू शकता, लिंक खालीलप्रमाणे. **https://etribaltest.maharashtra.gov.in/eVikas/Main/Common/Aboutevikas.aspx**
- जर आपल्या प्रणालीत महाविद्यालय/कोर्सचे नाव (महाविद्यालयाचे लॉगीण केल्यानंतर) अस्तीत्वात नसेल तर पुढील प्रक्रिया करा:

    1. महाविद्यालयांनी महाविद्यालय नोंदणी प्रत, विद्यापीठ संलग्नता प्रत आणि विद्यापीठ परवानगी प्रत प्रकल्प कार्यालयामध्ये जमा करावे (वरीलप्रमाणे).
    2. प्रकल्प कार्यालय वरील कागदपत्रे पडताळनी करून आयुक्त कार्यालय यांच्याकडे पाठवतील व आयुक्त कार्यालय ती माहिती पडताळणी करतील.
    3. आयुक्त कार्यालय महाविद्यालय/कोर्स सामावून घेण्यासाठी मान्यता देतील.
    4. जेव्हा आयुक्त कार्यालयाकडून मान्यता मिळेल त्यानंतरच महाविद्यालय/कोर्स प्रणालीमध्ये समाविष्ट केले जातील.

जर आपण आपला युजर आयडी किंवा पासवर्ड विसरला असाल तर आपल्या महाविद्यालय किंवा प्रकल्प कार्यालयाशी संपर्क साधा. पुन्हा नवीन नोंदणी करू नका .

ऑक्ट २०१३ आणि मार्च २०१४ चा एस. एस. सी. डाटा नोंदणी साठी सध्या उपलब्ध आहे.

आदिवासी विकास विभागाच्या विविध योजनांचा लाभ घेण्या साठी एकदाच नोंदणी करण्याची आवश्यकता आहे. आपण एकदा नोंदणी केली असल्यास पुन्हा नोंदणी करण्याची गरज नाही. आधी नोंदणी केलेला युजर आयडी व पासवर्ड सर्व योजनांसाठी वापरावा. आपण एका पेक्षा जास्त वेळा नोंदणी केल्यामुळे आधार क्रमांका बाबत शंका असल्यास आपल्या विद्यालय किंवा प्रकल्प

कार्यालयाशी संपर्क साधावा.

आधार क्रमांक प्राप्त विद्यार्थ्याने , सदर तपशील नोंदविणे जरुरी आहे.

अर्ज भरण्याच्या सूचना

| दस्तावेजाचे नाव | भाषा | सुधारित आवृत्तीची तारीख | माप |
|---|---|---|---|
| ▪ युजर बनविण्याची माहिती | मराठी | १५/०१/२०१३ | ०.८७ मेगा बाइट |
| ▪ भारत सरकार शिष्यवृत्ती | मराठी | १५/०१/२०१३ | ०.९२ मेगा बाइट |
| ▪ आधार क्रमांक माहिती अद्यावत करणे | मराठी | १५/०१/२०१३ | ०.४० मेगा बाइट |

कृपया चौकशीसाठी येथे संपर्क करा:
आदिवासी विकास आयुक्तालय
संपर्क ई-मेल:
etribal.support@maharashtra.gov.in

- महाविद्यालया ने संबंधित कोर्से फी अद्यायत करावी आणि संबंधित प्रकल्प कार्यालयाने मंजूर करावी . सदर प्रक्रिये साठी माहिती पुस्तिका वेब साईट वर उपलब्ध आहे.
- व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्याला जात पडताळणी दाखला माहिती देणे अनिवार्य आहे.
- महाविद्यालयाने परिशिष्ठ-ब (Statement-B) संबंधित प्रकल्प कार्यालयाला जमा करणे अनिवार्य आहे.

india.gov.in ©२०११-१२ सर्व अधिकार राखीव : आदिवासी विकास विभाग , महाराष्ट्र शासन अद्यायावत केलेली वेळ : १३/०६/२०१३

संकेतस्थळाचे धोरण गुप्तता धोरण संकेतस्थळ वापराच्या अटी स्वामित्व हक्क धोरण आमच्या विषयी संपर्क हायपरलिंक मदत

हे संकेतस्थळ बघण्यासाठी सर्वोत्तम वियोजन १०२४ X ७६८ आहे.